Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 June 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जून २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं भीषण विमान अपघात झालेल्या स्थळाला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. यावेळी पंतप्रधानांनी परिस्थितीचा तसंच बचाव कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी रुग्णालयातील परिस्थितीची पाहणी केली. काल दुपारी दीडच्या सुमारास हा विमान अपघात झाला होता, तूर्त हा परिसर बंद करण्यात आला असून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत. रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका यासह अन्य कर्मचारी चोवीस तास तिथं सेवा देत आहेत.

दरम्यान, २४१ मृतांची ओळख पटवण्यासाठी कुटुंबातील सदस्यांची डीएनए चाचणी केली जात आहे. यासाठी आतापर्यंत १९२ जणांचे नमुने घेण्यात आले आहेत. बी जे वैद्यकीय महाविद्यालयात डीएनए तपासणीची व्यवस्था करण्यात आली असून, प्रवाशांच्या कुटुंबीयांना आपले डीएनए नमुने देण्यास सांगितल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. याठिकाणी अनेक सुरक्षा पथकं बचाव कार्यात सहभागी आहेत.

****

गुजरातमध्ये विमान अपघातामुळे स्थलांतरित आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे अहमदाबाद-मुंबई आणि अहमदाबाद-नवी दिल्ली विशेष गाड्या चालवणार आहे. दरम्यान, १२ ते १४ जून दरम्यान प्रवासाची तारीख बदलायची असेल किंवा तिकीट रद्द करायचे असेल तर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असा निर्णय एअर इंडियाने जाहीर केला आहे.

****

विमान अपघाताबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे तसंच नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेमुळं काँग्रेसनं राज्यभरात आयोजित केलेले मशाल मोर्चे पुढचे दोन दिवस स्थगित केले आहेत. अपघातानंतर मंत्रालयात एक नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आल्याची माहिती विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. नागरिकांच्या मदतीसाठी हवाई वाहतूक मंत्रालय, एअर इंडिया, गुजरात सरकार यांनी हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले आहेत. नागरिकांना ०७९ –२३२ – ५१ ९००, ९९ ७८ ४० ५३ ०४, ० ११–२४ ६१ ०८ ४३ आणि ९६ ५० ३९ १८ ५९ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

****

राष्ट्रीय तपास संस्था– एनआयएनं अमृतसर पोलिस पोस्ट ग्रेनेड हल्ला प्रकरणात पंजाब आणि हरियाणामध्ये बब्बर खालसा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांशी संबंधित १५ ठिकाणी छापे टाकले आहेत.

पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यात एका पोलिस चौकीवर या वर्षी जानेवारी महिन्यात ग्रेनेड हल्ला झाला होता, या संदर्भात अमृतसर, तरणतारन, फिरोजपूर, पठाणकोट, कपूरथला, रूपनगर जिल्हे आणि हरियाणातील सिरसा इथं एनआयएनं झडतीसत्र राबवलं. या दरम्यान मोबाईल, डिजिटल उपकरणे आणि कागदपत्रांसह अनेक गुन्हेगारी साहित्य जप्त करण्यात आल आहे. भारतीय भूमीवर मोठ्या प्रमाणात दहशतवादी कारवाया घडवून आणण्याच्या उद्देशानं या दहशतवादी संघटनेनं कट रचल्याचं एनआयने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

****

राज्यातील सिंचन प्रकल्पासह उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. काल मुंबईत फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांना दिलेल्या प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता यांच्या प्रगतीचा आढावा, तसेच पंपस्टोरेज धोरणासंदर्भात सामंजस्य करारांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

****

जालना इथं काल विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत पोकळवडगाव आणि गोळापांगरी इथं शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आल्या. यावेळी शेतकऱ्यांना बियाणे खरेदी, बीज प्रक्रिया, बी-पेरणी, विविध पिकांची लागवड, सोयाबीन पिकासाठी बी.बी.एफ. तंत्रज्ञानाचा वापर तसंच बियाणे उगवण क्षमता चाचणी याबाबत माहिती देण्यात आली.

****

हवामान - येत्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर, कोकण किनारपट्टीवर काही ठिकाणी जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवली आहे. यादरम्यान, साठ ते सत्तर किलोमीटर प्रतितास वारे वाहण्याची शक्यता आहे. काल संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर शहरासह सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. कोल्हापूरमध्ये सरनोबतवाडी आणि मनेरमल दरम्यान एका शाळकरी मुलगा ओढ्यात वाहून गेला.

****

आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघ-एफआयएच हॉकी प्रो लीगमध्ये काल संध्याकाळी झालेल्या सामन्यात अर्जेंटिनानं भारताचा दोन विरुद्ध एक गोलनं पराभव केला.

****